वाचले क्र. १) जाहिरात क्र. ब-२, क्र.४४८ क्र.वायसीएमएच/७/कावि/४६५/२०१९ दि.०२/०८/२०१९
२) मा.अधिष्ठाता व निवड समिती यांनी शिफारस केलेली निवड व प्रतिक्षा यादी
३)मा.आयुक्त यांचेकडील दि. १९/०८/२०१९ रोजीचा मान्य प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
क्र.वायसीएमएच/७/कावि/४८३/२०१९
दिनांक-२१/०८/२०१९

विषय- यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी पदांवर नियुक्ती आदेश देणेबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये रूग्णांचा वाढता व्याप विचारात घेता सध्या आवश्यक असलेले २९ वरिष्ठ निवासी व ६३ कनिष्ठ निवासी पदे एकत्रित मानधनावर ६ महिने करीता भरणेकामी उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये दैनिक वृत्तपत्रात व मनपा संकेतस्थळावर जाहिरात प्रकटन प्रसिध्द करणेत आली असता सदरचे वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी पदांकरीता आलेले सर्व अर्जांची छाननी करून त्यामधून पात्र उमेदवारांपैकी दंतरोग विभाग वगळता इतर पदांचे उमेदवारांची मुलाखती घेऊन गुणाणुक्रमे निवड व प्रतिक्षा यादीनुसार उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये गुणानुक्रमे व आरक्षणानुसार उमेदवारांची निवड व प्रतिक्षायादी तयार करणेत आलेली असून त्यामधून निवड झालेल्या १५ वरिष्ठ निवासी व २४ कनिष्ठ निवासी उमेदवारांची उपलब्ध रिक्त पदांचा विचार करून वैद्यकिय सेवा ही तातडीची बाब असल्याने प्रथम निवड केलेल्या एकूण १५ वरिष्ठ निवासी व २४ कनिष्ठ निवासी उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिनेकीरता नियुक्ती आदेश निर्गत करून त्यास मा.स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेण्यात येईल.

सबब, मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-१८ या आदेशान्वये मा. अधिष्ठाता व निवड समिती यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालया यांनी मुलाखतीस उपस्थीत उमेदवारांची गुणानुक्रमे व आरक्षणानुसार निवड करून सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मधील १५ वरिष्ठ निवासी व प्रपत्र ब मधील २४ कनिष्ठ निवासी असे एकूण ३९ उमेदवारांची नियुक्ती करणेकामी शिफारस केलेली आहे. रूग्णालयास तातडीने डॉक्टरांची आवश्यकता असल्याने व मागील उमेदवारांचा सहा महिन्याचा नियुक्त कालावधी दि.१९/०८/२०१९ रोजी संपुष्टात येत असल्याने एक दिवस सेवा खंडीत करून नव्याने निवड झालेल्या १५ वरिष्ठ निवासी व २४ कनिष्ठ निवासी उमेदवरांना आदेशाच्या दिनांक-२१/०८/२०१९ पासून ते दि.२०/०२/२०२० अखेर १८० दिवस कालावधी साठी खालील अटी शर्तीस अधिन राहून तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक देणेस मंजुरी देत आहे. सोबतचे प्रपत्र अ व ब मध्ये नमुद व नियुक्त केलेल्या एकूण ३९ वरिष्ठ व कनिष्ठ निवासी उमेदवारांना देण्यात येणारे एकत्रित मानधन त्यांच्या नावापुढे दर्शविणेत आलेले आहे.

**अटी शर्ती-**

१) सदरचे पद निवासी स्वरूपाचे असल्याने संबंधित कनिष्ठ/वरिष्ठ निवासी यांना रूग्णालयामध्येच २४ तास वास्तव्य करावे लागेल.जे कनिष्ठ/वरिष्ठ निवासी रुग्णालयात वास्तव्य करत नाही असे निर्देशनात आलेस त्यांची सेवा त्वरीत समाप्त करणेत येईल.

२) कनिष्ठ/वरिष्ठ निवासी यांनी अपवादात्मक परिस्थेतीत रूग्णालय सोडावयाचे असल्यास रूग्णालय प्रमुख यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

३) कनिष्ठ/वरिष्ठ निवासी यांनी रूग्णांशी सुसंवाद साधुन वैद्यकिय सेवेतील त्यांच्या तक्रारी, शंका, अडचणी दुर करणे. रुग्णांशी व्यवस्थित संभाषण न केलेबाबत व तशा तक्रारी आलेस आपली नेमणुक त्वरीत रद्द करणेत येईल.

४) नियुक्ती कालावधी संपल्यानंतर सेवा समाप्तीबाबत स्वतंत्र आदेश निर्गत केले जाणार नाहीत.प्रस्तृतची मुदत संपल्यानंतर त्यांचा या पदावरील नेमणुक संदर्भात कोणत्याही प्रकराचा हक्क व दावा राहणार नाही.

५) नेमणुक कालावधीत नियुक्ती अधिका-यांच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेल त्याप्रमाणे त्यांच्या सुचनांचे, निर्देशांचे वेळोवेळी पालन करावे लागेल. व वेळोवेळी वरीष्ठ सागंतील ती कामे करावी लागतील.

६) नेमणुक कालावधी संपण्यापुर्वी नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी एक महीना आगाऊ सुचना देऊन नेमणुक रद्द करुन घ्यावी तशी आगाऊ सुचना न दिल्यास त्यांच्याकडुन एक महीन्याचा मेहनताना वसुल करणेत येईल.

७) नियुक्ती कालावधीत कामकाज असमाधानकारक असल्याचे निर्दशनात आल्यास किंवा तक्रारी आल्यास नियुक्ती कालावधीच्या कोणत्याही स्तरावर त्यांची सेवा समाप्ती करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राहतील.

८) कनिष्ठ/वरिष्ठ निवासी यांनी रुग्णालयीन कामकाज करीत असताना रुग्णांचे केसपेपरवर लिहण्यात येणा-या नोट्स वर खाली स्वाक्षरी करुन स्वत: चे नाव टाकणे किंवा नावाचा शिक्का उमटवणे बंधनकारक राहील.

९) कनिष्ठ/वरिष्ठ निवासी यांनी संबधीत शाखेतील सर्व रुग्णांची अँडमिशन , इन्व्हेस्टिगेशन्स ऑपरेशन्स, डीस्चार्ज यामध्ये सुसत्रता आणणे, Interns च्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, तज्ञ डॉक्टारांच्या सल्ल्यानुसार पेशंटला ट्रिटमेंट देणे व वरील सर्व कामात सुसुत्रता राखणे ही मुख्य कामे कनिष्ठ/वरिष्ठ निवासी यांना करावी लागतील.

१०)ज्या युनिट/ डिपार्टमेंट मध्ये कनिष्ठ/वरिष्ठ निवासी चे Postingकेलेले असेल त्या युनिट/डिपार्टमेंट च्या प्रशासकिय व संपुर्ण रुग्णसेवेची व त्या अनुषंगाने उदभवणा-या सर्व कामांची (Patient Management) जबाबदारी अध्यापक स्तर नंतर संबधीत वरिष्ठ व कनिष्ठ निवासी वर राहील.

११) डिपार्टमेंट /युनिटमध्ये काम करीत असताना Internes व Clinical Teaching व Lecture ची जबाबदारी कनिष्ठ/वरिष्ठ निवासी वर पुर्णपणे राहील.

१२) नेमणुकीच्या संदर्भात कनिष्ठ/वरिष्ठ निवासी ने दिलेली कोणतीही माहीती खोटी आहे. असे निर्दशनात आल्यास व आपले कामकाज समाधानकारक नसलेस अथवा आपल्या सेवेची आवश्यकता नसलेस कोणतीही पुर्व सुचना न देता व तशी खात्री पटल्यास कोणत्याही प्रकारची चौकशी न करता अथवा कारणे दाखवा नोटीस व तत्सम नोटीस न बजावता महापालिका सेवेततुन कमी केले जाईल व त्याबाबत संबधीत कनिष्ठ/वरिष्ठ निवासी यांना कोर्टात दाद मागता ये़णार नाही.

१३) कनिष्ठ/वरिष्ठ निवासी यांना ६ महीन्यातुन फक्त ४ दिवस किरकोळ रजा मिळेल. अन्य रजा (सार्वजनिक सुट्यासहीत) देय राहणार नाहीत. अन्य कारणास्तव गैरहजेरी विनावेतनी करण्यात येईल.अपवादात्मक परिस्थितीत ही रजा पुढच्या महीन्यात देणेबाबत विभाग प्रमुखांना अधिकार राहतील.

१४) कितीही दिवस एकत्रीत सेवा झाली तरी वेतनवाढ अथवा अन्य कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत. तसेच रजा प्रवास भत्ता सानुग्रह अनुदान व बोनस देय राहणार नाही.

१५) नेमणुक कालावधी संपल्यानंतर त्यांना या पदावरील नेमणुक संबधाने कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा राहणार नाही.अशी सेवा एकुण (Aggregate) कितीही झाली तरी उमेदवारास सेवेत नियमित स्वरुपाची नेमणुक आपोआप मिळणार नाही.

१६) सदर कनिष्ठ/वरिष्ठ निवासी यांनी उपस्थितीसाठी बायोमेट्रीक दिवसातुन दोन वेळा करणे व मस्टरवरती सही करणे बंधनकारक राहील. ज्या दिवसाचा थंम्ब नसेल त्या दिवसाचा पगार अदा केला जाणार नाही.

१७) तात्पुरत्या स्वरूरपातील मानधनावरील नियुक्ती नोकरी नाही. त्यामुळे वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणून निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाह्य दबाव आणणार नाही. याबाबत रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

१८) आयकर नियमाप्रमाणे देय मानधनामधून TDS वजा करुन अंतिम रक्कम अदा करणेत येईल.

१९) कामावर वेळेवर हजर राहुन ओळखपत्र व गणवेश परिधान करणे. बंधनकराक राहील अन्यथा दंडात्मक कारवाई करणेत येईल. तसेच वॉर्ड इनचार्ज नियंत्रीत अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

२०) नेमणुक झालेल्या उमेदवारांनी रुजु झाल्याबरोबर बँक ऑफ बडोदा ,पी.सी.एम.सी. मध्ये खाते उघडुन त्याचा क्रमांक व पॅन कार्डची झेरॉक्स संबधीत पगार लिपीकाकडे द्यावे. सदर बाबींची पुर्तता न केलेस पगारास विलंब झालेस त्यास रुग्णालयीन प्रशासन जबाबदार राहणार नाही.

२१) आदेशाच्या दिनांकापासुन ७ दिवसांच्या आत रुजु न झालेस सदरचा आदेश रद्द करण्यात येईल. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

सही/-
(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

प्रती श्री/श्रीम.----------------------------------------

प्रत, १) लेखा विभाग
२)सर्व्हररूम/ओटी विभाग

१) संबधीत पगारबील लिपीक २/- माहितीसाठी व पुढील कार्यवाही.

संबधीतांचे वेदन अदायकी करतांना थम्ब रिपोर्टवर संबधीत विभागाचे शाखाप्रमुखांचे स्वाक्षरी नसल्यास वेतन अदा करू नये याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

सही/-
अधिष्ठाता
यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय पदव्युत्तर संस्था

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
## यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
## जाहिरात क्र. ब-२, ४४८/२०१९, दिनांक-०२/०८/२०१९

**निवड समितीने शिफारस केलेल्या निवडयादीनुसार तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर ६ महिनेकरीता कनिष्ठ निवासी पदांची निवड यादी.**
**(नियुक्ती कालावधी दि.२१/०८/२०१९ ते दिनांक-२०/०२/२०२० पर्यंत)**
**प्रपत्र - ब**
**कनिष्ठ निवासी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | मानधन प्रती महिना र. रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.निशिगंधा सुरेश जाधव | खुला | निवड- खुला-१ | मेडीसीन | ४५०००/- | |
| २ | डॉ. ज्ञानेश मोहन पाटील | खुला | निवड- खुला-२ | मेडीसीन | ५००००/- | |
| ३ | डॉ.प्रसाद चंद्रकांत भांडगे | खुला | निवड- खुला-३ | मेडीसीन | ४५०००/- | |
| ४ | डॉ.नेहा साबीर खान | खुला | निवड- खुला-४ | मेडीसीन | ४५०००/- | |
| ५ | डॉ. सचिन हरिभाऊ रेडे | एसईबीसी | निवड एसईबीसी-१ | मेडीसीन | ४५०००/- | |
| ६ | डॉ. समिक्षा सुभाष वाघचौरे | इमाव | निवड- इमाव-१ | मेडीसीन | ४५०००/- | |
| ७ | डॉ. सुनिल शाम झोल | अ.जा | निवड- अजा-१ | मेडीसीन | ४५०००/- | |
| ८ | डॉ. विवेक भिमराव सरोदे | अ.जा | निवड- अजा-२ | मेडीसीन | ४५०००/- | |
| ९ | डॉ. पद्मनाभ नितीन देशपांडे | खुला | निवड- खुला-१ | सर्जरी | ४५०००/- | |
| १० | डॉ. जिवन महादेव पाटील | खुला | निवड-खुला-२ | सर्जरी | ४५०००/- | |
| ११ | डॉ.पार्थ अदित्य पोंक्षे | खुला | निवड-खुला-१ | स्त्रीरोग | ५००००/- | |
| १२ | डॉ. मौलिका शिरिष शाह | खुला | निवड- खुला-२ | स्त्रीरोग | ५००००/- | |
| १३ | डॉ. सोनल शिवकुमार अग्रवाल | खुला | निवड-खुला-३ | स्त्रीरोग | ५००००/- | |
| १४ | डॉ. विक्रम विलासराव सातारकर | इमाव | निवड- इमाव-१ | स्त्रीरोग | ५००००/- | |
| १५ | डॉ. सिमा राजकुमार बिसवास | अ.जा | निवड- अजा-१ | स्त्रीरोग | ४५०००/- | |
| १६ | डॉ.जयेश अविनाश भानुशाली | खुला | निवड-खुला-१ | ऑर्थोरोग | ५००००/- | |
| १७ | डॉ.सुनिल शंकरराव गायकवाड | अ.जा | निवड-अजा-१ | ऑर्थोरोग | ५००००/- | |
| १८ | डॉ. संगिता ज्ञानोबा चिवळे | अ.ज | निवड खुला-१ | बालरोग | ५००००/- | |
| १९ | डॉ. स्नेहल सुभाषराव उत्तरवार | इमाव. | निवड-इमाव-१ | भुलशास्त्र | ५००००/- | |
| २० | डॉ. अमित सुभाष चौधरी | इमाव | निवड-खुला | नेत्ररोग | ५००००/- | |
| २१ | डॉ. दिपा सुरेंद्र पाटील | खुला | निवड-खुला-१ | मानसोपचार | ५००००/- | |
| २२ | डॉ. सौम्या गोपालक्रिष्णन नायर | खुला | निवड-खुला-१ | उरोरोग | ४५०००/- | |
| २३ | डॉ. सिध्दार्थ संतोष श्रीवास्तव | खुला | निवड- खुला-१ | कान,नाक,घसा | ५००००/- | |
| २४ | डॉ. खलील दस्तगीर जमादार | खुला | निवड-खुला-१ | रेडिओलॉजी | ५००००/- | |

**आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/४८३/२०१९**
**दिनांक- २१/०८/२०१९ चे लगत**

**सही/-**
**(श्रावण हर्डीकर)**
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
## यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
### जाहिरात क्र. ब-२, ४४८/२०१९, दिनांक- ०२/०८/२०१९

**निवड समितीने शिफारस केलेल्या निवडयादीनुसार तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर ६ महिनेकरीता वरिष्ठ निवासी  पदांची निवड यादी.**

**(नियुक्ती कालावधी दिनांक- २१/०८/२०१९ ते दिनांक- २०/०२/२०२० पर्यंत)**

**प्रपत्र अ**

**वरिष्ठ निवासी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | मानधन प्रती महिना र. रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. सुषमा सत्यनाराण चांडक | खुला | निवड खुला-१ | सर्जरी | ५५०००/- | |
| २ | डॉ. कांबळे राजरत्न नरेश | एस.सी. | निवड अ.जा-१ | सर्जरी | ५५०००/- | |
| ३ | डॉ. राऊत चंद्रशेखर धर्मराज | खुला | निवड खुला-१ | गायनॅक | ५५०००/- | |
| ४ | डॉ.रंगारी भारती शंकर | ए.सी. | निवड अ.जा-१ | गायनॅक | ५५०००/- | |
| ५ | डॉ.इंगळे अश्विनी परशुराम | इ.मा.व. | निवड इमाव-१ | गायनॅक | ५५०००/- | |
| ६ | डॉ.कुलकर्णी निलेश विलास | खुला | निवड-खुला-१ | ऑर्थोरोग | ५५०००/- | |
| ७ | डॉ. मेंढे चित्तानंद शरद | इ.मा.व | निवड- इमाव-१ | ऑर्थोरोग | ५५०००/- | |
| ८ | डॉ.गावडे कांचन गुलाबराव | खुला | निवड-खुला-१ | बालरोग | ५५०००/- | |
| ९ | डॉ. पिंगळे सुजित शिवाजीराव | NT-२ | निवड-खुला-१ | भुलशास्त्र | ५५०००/- | |
| १० | डॉ. देशमुख कुलदीप अरविंदराव | इ.मा.व | निवड-इमाव-१ | भुलशास्त्र | ५५०००/- | |
| ११ | डॉ.मिसाळ वरून उत्तमराव | NT-C | निवड-खुला-१ | रेडिओलॉजी | ५५०००/- | |
| १२ | डॉ. मग्गु गौरव दीपक | खुला | निवड-खुला-१ | मानसोपचार | ५५०००/- | |
| १३ | डॉ.जरंडीकर अपूर्वा अनिल | खुला | निवड-खुला-१ | कान,नाक,घसा | ५५०००/- | |
| १४ | डॉ.पोनाथिल अभिषेक प्रदीप | खुला | निवड-खुला-१ | त्वचारोग | ५५०००/- | |
| १५ | डॉ. इरोळे सोनल अशोक | खुला | निवड-खुला-१ | नेत्ररोग | ५५०००/- | |

**आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/४८३/२०१९**
**दिनांक-२१/०८/२०१९ चे लगत**

**सही/-**
**(श्रावण हर्डीकर)**
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८